# अंबरनाथ नगरपरिषद

सामान्य प्रशासन विभाग
जा. क्र. अंनप/२०१७-१८/ ५०७
दिनांक : २० /०१/२०१८

संदर्भ :- कमला मिल्स कंपाऊंड मुंबई येथील आगीची दि. २७/१२/२०१८ ची घटना

## कार्यालयीन आदेश

ज्याअर्थी, वरील संदर्भिय घटनेच्या अनुषंगाने सदर घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी सर्व शासकीय यंत्रणेने कंबर कसली असून अंबरनाथ नगरपरिषद हद्दीत सुध्दा हॉटेल, बार, रेस्टॉरंट, मॉल, व्यापारी संकुले, रुग्णालय, शाळा, मार्केट प्लेसेस, सुपर मार्केट, मंगल कार्यालय हॉल इत्यादी ठिकाणी असलेले प्रवेशद्वार, बाहेर पडण्याचे मार्ग, बेकायदा केलेले बांधकाम, वाढीव अनाधिकृत वापर इ. बाबींची तपासणी करणे आवश्यक आहे, जेणेकरुन वरील व्यवसाय ठिकाणी आग किंवा अन्य आपत्ती उद्‌भवल्यास जिवित / वित्त हानी होणार नाही.

ज्याअर्थी, बार, रेस्टॉरंट, कपडयांची दुकाने, साडीसेंटर, बँका, बेकरी, रस्त्यावरील अनाधिकृत नास्ता सेंटर, शॉपिंग सेंटर, सिनेमागृह इत्यादीची तपासणी करणे व सदर जागेत सुरु असलेले व्यवसायांचे वापर मंजूरीनुसार आहे किंवा नाही इत्यादी बाबतीत तपासणी करुन आवश्यक त्या सुधारणा, दुरुस्त्या त्या त्या व्यवसायधारकाकडून करणे आवश्यक आहे. वरील नमूद सर्व व्यवसाय ठिकाणी सुर असलेला वापर योग्य आहे किंवा नाही इत्यादी बाबींची तपासणी करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, संबंधित बाबींचे तपासणी व उचित कार्यवाही करण्यासाठी खाली नमुद केल्याप्रमाणे अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | विभाग | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. मनिष भामरे, सहा. नगररचनाकार | नगररचना विभाग | शहरातील अनाधिकृत बांधकामे, उंच इमारती, वाढीव बांधकामे, वाढीव वापर इ. बाबतीत तपासणी करणे, शहरातील संपुर्ण वाणिज्य वापर त्या त्या जागेमध्ये मंजूर आहे किंवा नाही हे पहाणे. नसल्यास योग्य ती कार्यवाही करणे. तसेच वाणिज्य व्यवसायांचे पॅसेज, जिने, दरवाजे, अरुंद असल्यास योग्य ती कार्यवाही करणे. |
| ०२ | श्री. देवेंद्र मोरखंडीकर, अभियंता | नगररचना विभाग | सहा. नगररचनाकार यांचे अध्यक्षतेखाली काम पहाणे तसेच मंजूर बांधकाम परवानगी नुसार व्यवसाय अनुज्ञेय आहे किंवा नाही याची तपासणी करुन आवश्यक ती कार्यवाही करुन अहवाल सादर करणे. |
| ०३ | श्री. गजानन मंदाडे, प्रशासन अधिकारी | शिक्षण विभाग | नगरपरिषद हद्दीतील सर्व शासकीय व खाजगी शाळांची तपासणी करणे, बांधकाम सुरक्षीत असले बाबत अहवाल तसेच शाळा व विद्यार्थी यांचे सुरक्षतेबाबत अहवाल सादर करणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ०४ | श्री. भागवत सोनोने, अग्निशमन अधिकारी | अग्निशमन विभाग | शहरातील उंच इमारतींचे निरीक्षण / तपासणी करणे आगी संबंधी जनजागृती मोहिम राबविणे, उंच इमारतींमधील अग्निशमन यंत्रणा तपासणे, शाळा, कॉलेजमध्ये जनजागृती अभियान राबविणे, हॉटेल बार, रेस्टॉरंट, लॉजींग इ. अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करणे या सर्वांचा अहवाल सादर करणे. |
| ०५ | श्री. सुरेश पाटील, आरोग्य विभागप्रमुख | आरोग्य विभाग | शहरातील सर्व हॉटेल्स्, बार, रेस्टॉरेंट, ढाबा, टी-सेंटर, वडापावं सेंटर, चायनिज सेंटर, पान शॉप इ. ची नोंदी घेऊन स्वच्छतेबाबत व कचऱ्याचे विल्हेवाटीबाबत कार्यवाही करणे. |
| ०६ | श्री. प्रमोद परमार, बाजार विभागप्रमुख | बाजार विभाग | नगरपरिषद अधिनियम १९६५ नुसार वरील सर्व व्यवसायधारकांना करत असलेला व्यवसाय मंजूर व अनुज्ञेय असल्यास व्यवसाय नोंदणी करुन घेणे. |
| ०७ | श्री. नरेंद्र संख्ये व श्री. देवसिंग पाटील, पदनिर्देशित अधिकारी | अतिक्रमण विभाग | छोटे उद्योग धंदे, गोडाऊन, छत्रपती शिव मार्केट, बांगडी गल्ली, स्टेशन परिसर इ. ची पहाणी करुन आपात प्रसंगी वाहने जातील या प्रमाणे रचना करावी. तसेच रस्त्यावरील हातगाडया, वडापावची गाडी, चायनीज गाडी, कायमस्वरुपी बंद करणेबाबतची कार्यवाही करावी. |
| ०८ | श्री. राजेंद्र बोरकर विद्युत अभियंता | विद्युत विभाग | अंबरनाथ शहरातील पुर्व व पश्चिम विभागातील रस्त्यावरील, गल्ली बोळामधील, अरुंद ठिकाणच्या विद्युत तारा, वायर यांचे निरीक्षण करुन रस्त्याच्यावरुन जड वाहने जाताना अडथळा करणारे सर्व विद्युत तारे यांची योग्य ती उंची वाढवून एम.एस.ई.बी. कार्यालयाशी समन्वय साधून आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच गर्दीच्या ठिकाणी जसे भाजी मार्केट, शिव मार्केट इ. जागेच्या विद्युत व्यवस्थेचे पहाणी करुन शार्ट सर्किट होणार नाही याबाबत कार्यवाही करावी. |

त्याअर्थी, सदर पथकाने सर्व नियमांचे अवलोकन करुन नगरपरिषद क्षेत्रामध्ये व्यवसाय स्थळांची तपासणी करणेबाबत आवश्यक ती उचित कार्यवाही करणेची दक्षता घ्यावी. सदर संतुलन बिघडविणाऱ्या प्रत्येक घटनेवर नियंत्रण ठेवावे व प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेस केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांना सादर करावा.

सदर आदेश आज रोजी कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या पदांच्या नावाने आहेत भविष्यात सदर पदांवर कार्यरत असलेले अधिकारी या कक्षाचा भाग असणार आहेत.

अंबरनाथ नगरपरिषद अंबरनाथ

(देविदास पवार)
मुख्याधिकारी
अंबरनाथ नगरपरिषद